MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ०४/२०१६-१७/७९ दिनांक:०८-०७-२०१६

**आदेश**
**आदेश केस क्र. ०४/२०१६-२०१७**

| | |
|---|---|
| श्री सुरेश रेवनाप्पा तेलगांव,<br>मु. पो. विठ्ठलवाडी उमदी,<br>ता. तासगांव, जिल्हा सांगली. | **अर्जदार** |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, सांगली<br><br>२) कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठेमहांकाळ<br><br>३) उपकार्यकारी अभियंता / अति. कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभागीय कार्यालय, संख | **पक्षकार** |

**कोरमः-** १. श्री. पी.व्ही.खपली, सदस्य सचिव,
२. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

मी श्री. पी.व्ही.खपली, सदस्य सचिव ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर परिमंडळ खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहे.

श्री सुरेश रेवनाप्पा तेलगांव, मु.पो. विठ्ठलवाडी उमदी ता. जत. जि. सांगली यांनी आपणांस शेती पंपासाठी त्वरीत विज जोडणी द्यावी यासाठी परीशिष्ट 'अ' मध्ये मंचाकडे दिनांक १६-०४-२०१६ रोजी अर्ज दाखल केला आहे. त्यांची सुनावणी दिनांक २५-०५-२०१६रोजी ग्राहक तक्रार निवारण मंच कोल्हापूर येथे घेण्यात आली. यासाठी श्री एस. एस. दराडे, कार्यकारी अभियंता कवठेमहाकांळ, श्री एम. आर. शेंडे, उप कार्यकारी अभियंता संख कार्यालय हे उपस्थित होते.

श्री सुरेश रेवनाप्पा तेलगांव यांच्या तर्फे ग्राहक प्रतिनिधी श्री एच.डी. खापरे, उपस्थित होते. सुनावणी दरम्यान उपकार्यकारी अभियंता महावितरण उपविभाग संख यांच्या तर्फे मंचाकडे दाखल झालेल्या पत्रासंबंधी ग्राहक प्रतिनिधी यांना माहिती देण्यात आली. या पत्राची प्रत ग्राहकास पाठवली असल्याचे सांगण्यात आले. सदर पत्राप्रमाणे दिनांक २५-०४-२०१६ रोजी ग्राहकांस विज जोडणी देण्यात आली आहे. मीटर क्रमांक ६५१५३४३ Make Genus असा आहे. सबब ग्राहकाची मागणी पुर्ण झाल्यामुळे ही तक्रार निकाली काढण्यात आल्याचे मंचातर्फे सुचित करण्यात आले यावर ग्राहक प्रतिनिधीनी आमची विलंब भरपाईची मागणी कायम असल्याचे सांगितले. मंचातर्फे आपणासं विज जोडणी मिळाली आहे. तरी भरपाईची मागणी मागे घ्यावी असे सूचित करण्यात आले. यावर ग्राहक प्रतिनिधी आपली मागणी कायम असल्याचे सांगितले. वरील चर्चा विचारात घेता खालील मुद्दे उपस्थित होतात.

१) ग्राहकाची तक्रार निकाली काढता येईल काय?

उत्तर होय

२) विलंब भरपाईची मागणी मान्य करता येईल काय?

उत्तर होय

## कारणमिमांसा

१) ग्राहकांला विज जोडणी मिळाली आहे. सबब ही तक्रार निकाली काढण्यात कोणतीच अडचण नाही. म्हणून मुद्दा क्रमांक १ उत्तर होय असे आहे.

२) ग्राहकांने आपणांस विज जोडणी मिळाली म्हणून रु. ५०५०/- हे पावती क्रमांक २०९६९४ दिनांक १०-१०-२०११ रोजी भरले आहेत.

महाराष्ट्र राज्य विज नियम आयोग (वितरण परवाना धारकांच्या कृतीची मानके , विद्युत पुरवठा सुरु करण्याचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण ) विनिमय २०१४ नुसार हा ग्राहक भरपाई मिळणेस पात्र आहे. म्हणून कलम क्रमांक ४.८ नुसार ग्राहकांस भरपाईची रक्कम देण्यासाठी परिशिष्ट 'अ' मधील १/३ नुसार कार्यवाही व्हावी. ग्राहकांने विलबासाठी कोणाकडे अर्ज करावा याचे मार्गदर्शन ग्राहकांस करण्यात यावे.असे हा मंच सूचित करत आहे.

**आदेश**

१. ग्राहकाचा अर्ज निकाली काढण्यात येत आहे.
२. नियमानुसार ग्राहकास विलंब भरपाईबाबत अवगत करावे
३. सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.
४. या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

(पी.व्ही. खपली)
सदस्य सचिव

अध्यक्ष पद दिनांक १६-१२-२०१४ पासून रिक्त.

श्री. पी. एस. बुरांडे,
ग्राहक सदस्य

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.